
सकाळ अॅग्रोवन

# द्राक्ष बागेत कलम करण्याची योग्य वेळ

अनिल थुट्टे, डॉ. आर. जी. सोमकुंवर

नवीन द्राक्ष बाग उभारताना खुंट खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. खुंटांची लागवड ही फेब्रुवारी ते मार्च महिन्यामध्ये केली जाते. त्यानंतर जमिनीमध्ये खुंट रोपांच्या मुळांचा विकास व नवीन फुटींचा विकास पाच ते सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये होतो. वातावरणातील ३० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान व ८० टक्क्यांपेक्षा जास्त आर्द्रता ही स्थिती खुंटाच्या वाढीसाठी तसेच कलम करण्यासाठी फायदेशीर असते. प्रामुख्याने ऑगस्ट ते सप्टेंबर अखेरपर्यंतचा कालावधी द्राक्ष बागेत कलम करण्यासाठी योग्य मानला जातो. मात्र सध्या होत असलेल्या सततच्या पावसामुळे कलम करण्यास विलंब होऊ शकतो. कलम काडी आणि खुंट काडीची निवड करताना खालील बाबी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.



निवडलेल्या खुंटकाड्या.

## खुंटकाडीची कलम करण्यापूर्वीची तयारी

बागेत खुंटरोपाच्या बऱ्याच फुटी निघालेल्या दिसून येतील. या फुटींमध्ये काही बारीक, जाड, परिपक्व व तसेच अर्ध परिपक्व किंवा कोवळ्या काड्याही असतील. बागेतील प्रत्येक कलम यशस्वी होण्याकरिता प्रत्येक खुंटाच्या दोन काड्यांवर कलम केले जाते. या वेळी कलम करताना काडीची निवड सोपी व्हावी म्हणून प्रत्येक खुंटरोपाच्या तीन काड्या राखाव्यात. अतिरिक्त काड्या काढून टाकाव्यात. कलम करतेवेळी सर्वांत महत्त्वाचे म्हणजे काडी रसरशीत असावी. मात्र काही परिस्थितीमध्ये अशी काडी मिळवणे शक्य होत नाही. तेव्हा कलम सुरू करण्याच्या ४-५ दिवसांपूर्वी बागेत पाणी द्यावे. यामुळे काडीमध्ये रस तयार होण्यास मदत होईल.

## खुंटांवरील रोग व कीडनियंत्रण

सतत पावसामुळे काही वेळा जुन्या पानांवर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव आढळून येतो. यामध्ये पानांच्या मागील बाजूस तांबूस पावडरचा थर दिसून येते. त्यावरील जिवाणूंमुळे पानांमधील रस शोषला जातो. देठ व पानांमधील मजबुती कमी होऊन पान गळून पडते. यामुळे काडीमध्ये रस कमी पडतो. कलम जोडणीमध्ये अडथळा येतो. या रोगाच्या नियंत्रणासाठी क्लोरोथॅलोनील १.५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणे फवारणी करता येईल.

## खुंटकाडीची निवड

- खुंट काडीची निवड करताना काडीची जाडी आठ ते दहा मि.मी. (पेन्सिल साइज) असावी.
- खुंटकाडी रसरशीत असावी.
- खुंटकाडीची उंची जमिनीपासून सव्वा फूट असावी.
- खुंटकाडीची वाढ जोमदार, सरळ व सशक्त असावी.
- खुंटकाडी ही अर्ध परिपक्व असावी.
- खुंटकाडी कीड व रोगमुक्त असावी.
- काडी निवडताना बऱ्याच वेळा हवी तशी काडी मिळत नाही, त्यासाठी चार ते पाच दिवस अगोदर बागेत पाणी द्यावे. त्यामुळे काडीमध्ये रस तयार होऊन कॅम्बिअम म्हणजेच झायलम आणि फायलम दरम्यानचा एक पेशींचा थर चांगला तयार होतो. कलम यशस्वी होण्यास मदत होते.

## द्राक्ष जातींची निवड

आपल्या जमिनीच्या प्रकारानुसार कोणती द्राक्षजात चांगल्या प्रमाणात उत्पादन देऊ शकते याचा विचार करून द्राक्ष जातींची निवड करावी. आपण निवडत असलेल्या द्राक्ष जातीला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील अचूक मागणीचा अंदाज घ्यावा. त्याच प्रमाणे त्या द्राक्ष जातीची गुणवत्ता, दर्जा, टिकवण क्षमता आणि ग्राहकांची पसंती अशा बाबींचाही प्राधान्याने विचार करावा. बदलत्या हवामानानुसार निवडलेली द्राक्षजात ही कीड व रोगांना किती प्रतिकारक्षम हेही जाणून घ्यावे. उदा. काळ्या कसदार जमिनीमध्ये रंगीत व काळ्या द्राक्ष जाती चांगल्या उत्पादन देतात. हलक्या व मुरमाड जमिनीमध्ये लांब मण्याच्या द्राक्ष जाती चांगला प्रतिसाद देतात. आपला द्राक्ष उत्पादनाचा उद्देश लक्षात घेऊन खालील पैकी योग्य त्या द्राक्ष जातींची निवड करावी.

- **रंगीत द्राक्षजाती :** फ्लेम सीडलेस, क्रीमसन सीडलेस, रेड ग्लोब, फँटसी सीडलेस, शरद सीडलेस या द्राक्ष जातींना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगली मागणी आहे.
- **लांब मण्याच्या रंगीत द्राक्षजाती :** क्रिश्ना सीडलेस, सरिता सीडलेस, ज्योती सीडलेस इ.
- **हिरव्या द्राक्षजाती :** मांजरी नवीन, मांजरी किशमिश, थॉमसन सीडलेस, तास-ए-गणेश इ. या जातींचा वापर आपण खाण्यासाठी तसेच बेदाणा बनविण्यासाठी उपयोग करू शकतो.
- **हिरव्या लांब मण्याच्या द्राक्षजाती :** सोनाका, माणिक चमन, सुपर सोनाका, आर.के.ई.

## कलम काडीची निवड

कलम काडी पूर्णपणे परिपक्व असल्याची खात्री करून घ्यावी. कारण काही वेळा कलम काडी ही बाहेरून परिपक्व दिसत असली, तरी आतील भागामध्ये परिपक्व असेलच असे नाही. काडी निवडण्यापूर्वी काडीचा पीथ पूर्णपणे तपकिरी रंगाचा असावा. सध्या सूर्यप्रकाश कमी प्रमाणात असल्यामुळे काडी परिपक्व होण्यात अडचण निर्माण होऊ शकते.

- कलम काडी रसरशीत असणे महत्त्वाचे आहे.
- कलम काडी निवडताना त्यावरील डोळे जिवंत असायला हवे.
- कलम काडी ही रोगमुक्त व सशक्त असावी.
- कलम काडी ठिसूळ व गोल असावी.

## कलम करणे

- सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कलम करणारी व्यक्ती कलम करण्यात तरबेज असली पाहिजे.
- कलम करण्याअगोदर कलमकाडी कार्बेन्डाझिम ३ ते ४ ग्रॅम प्रति लिटर पाणी या द्रावणात बुडवून घ्यावी. यामुळे काडीवरील रोगाचा प्रादुर्भाव कमी होतो.
- कलम करताना खुंट व कलमकताडीची जाडी सारखी असायला हवी. नसल्यास कोणत्याही एका बाजूने ती व्यवस्थित जुळवून घ्यावी, त्यामुळे कॅलस फॉर्मेशन चांगले होईल. कलम यशस्वी होण्याची शक्यता वाढते. कलम केल्यानंतर कलम काडीमधून रस प्रवाहित होत असल्यास असे कलम यशस्वी होण्याची जास्त शक्यता असते.
- कलम करतेवेळी कलम काडीला पाचर करताना एका बाजूला एकाच वेळी चाकूचा वापर करावा. वारंवार चाकूचा वापर केल्यास काडीला इजा होऊ शकते.
- कलम केलेल्या ठिकाणी पॉलिथिन योग्य प्रकारे व पक्क्या स्वरूपात बांधावे. बांधणी करताना नैसर्गिकरीत्या कुजणाऱ्या जैवविघटनशील पट्ट्या (बायोडिग्रेडेबल स्ट्रीप्स) वापराव्यात.
- कलम केल्यानंतर खुंट योग्य प्रकारे बांबूला बांधून घ्यावा. कलम केलेल्या ठिकाणी कुठलीही इजा पोहोचणार नाही, याची काळजी घ्यावी.
- कलम केल्यानंतर खुंटावरील अतिरिक्त फुटवे काढून टाकावे.
- कलम यशस्वी झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात फुटींवर येणाऱ्या रोग व किडींच्या नियंत्रणावर विशेष लक्ष देणे गरजेचे असते. उदा. केवडा (डाऊनी मिल्ड्यू), अळी, उडद्या व अन्य रस शोषक किडी इ.

## कलम अयशस्वी होण्याची कारणे

- कलमकाडी निवडताना एक समान व योग्य आकाराच्या काडींची उपलब्धता न झाल्यामुळे खुंट व कलमकाडीमध्ये योग्य मिलाप होत नाही. कलम अयशस्वी होते.
- निवडलेल्या कलमकाडीवरील डोळे मृत असल्यास कलम यशस्वी होत नाही.
- कलम करतेवेळी खुंटकाडी व कलमकाडी यामधील आतील गराचा भाग आणि बाजूचा सालीचा भाग (फ्लोयम टू फ्लोयम आणि झायलम टू झायलम) योग्य प्रकारे जुळणे गरजेचे असते. असे न झाल्यास कलम अयशस्वी होते.
- बागेत खुंट लावलेला असताना काही शेतकरी आंतरपीक म्हणून उडीद, मूग आणि भुईमूग यांसारखी पिके घेतात. या पिकांमध्ये काही शेतकरी प्रोपिकोनॅझोल सारख्या बुरशीनाशकांचा वापर करतात. त्याचे तुषार खुंटावर उडाल्यास खुंटाच्या वाढीवर परिणाम होतो. तसेच एकसारख्या फुटी मिळत नाहीत. त्यामुळे आंतरपिकावरही अशी फवारणी शक्यतो टाळावी.



परिपक्व कलमकाड्या



तपकिरी पीथ असलेल्या कलमकाड्या या परिपक्व मानल्या जातात.

- अनिल थुट्टे, ७३५०२९८८५१, (पीएच. डी. संशोधक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी),
- डॉ. आर. जी. सोमकुंवर, ९४२२०३२९८८, (प्रमुख शास्त्रज्ञ, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे)

- कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉएंट अॅग्रेस्कोप्राप्त आहेत. • फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे. • खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे. • बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे. • लेबल क्लेम वाचावेत. • पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत. • रसायनांचा गट तपासावा. • पीएचआय, एमआरएल तपासावेत. • पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.

- मधमाशी, मित्रकीटकांना हानिकारक कीडनाशकांचा वापर टाळावा. • पीक फुलोरा अवस्था लक्षात घेऊन कीडनाशकांचा समंजस वापर करावा.